**Indian Academy of Pediatrics (IAP)**

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण ६०:**

# जन्मजात व जन्मानंतर हायपोथायरॉईडीझम


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानीवडेकर
अनुवादक : डॉ. चंद्रशेखर दाभाडकर
पुनरावलोकन : डॉ. जयंत पांढरीकर
सौ. लीना पागे

*Convener:* Ruchi Parikh
*Members:* Aarti A Kinikar, Ashish Pathak, M Vijayakumar
*Reviewer:* Mahesh Maheshwari




**थायरॉईडच्या कमतरतेने येणारे मतिमंदत्व हे योग्य वेळी ओळखून उपचार केल्यास टाळता येण्याजोगे मतिमंदत्वाचे कारण आहे. त्यामुळे प्रत्येक मुलाची थायरॉईडच्या कमतरतेसाठी तपासणी अत्यावश्यक आहे. थायरॉईडच्या कमतरता जाणवल्यावर त्याच्यावर योग्य ते उपाय केल्यास ह्या मुलांचे मतिमंदत्व आपण टाळू शकतो.**

## जन्मजात व जन्मानंतर हायपोथायरॉईडीझम संबंधी विचारले जाणारे १० प्रश्न

प्र.१ अ) थायरॉईड ग्रंथी म्हणजे काय? शरीरात ती कुठे असते?
ब) थायरॉईड ग्रंथीचे काय कार्य असते?
क) लहान मुलांमध्ये थायरॉईड संप्रेरकाचे काय महत्व असते?

प्र.२ अ) हायपोथायरॉईडीझम म्हणजे काय?
ब) जन्मजात हायपोथायरॉईडीझम म्हणजे काय?
क) जन्मानंतर होणारा (Acquired) हायपोथायरॉईडीझम म्हणजे काय?

प्र.३ माझ्या मुलाला हा आजार आहे हे मी कसे ओळखावे?

प्र.४ अ) हायपोथायरॉईडीझम हे निदान करण्याकरता कोणत्या चाचण्या करणे आवश्यक आहे?
ब) थायरॉईडच्या चाचण्यांशिवाय इतर काही चाचण्या करणे आवश्यक असते का? याचा निदान व उपचारात काय फायदा होतो?

प्र.५ या आजाराकरता काय काय उपचार पद्धती आहेत?

प्र.६ या उपचाराबद्दल मी आणखी काय जाणून घ्यायला हवे?

प्र.७ अ) निदान झाल्यानंतर मी डॉक्टरांकडे कधी जायला पाहिजे?
ब) मी किती रक्त तपासण्या केल्या पाहिजेत?
क) मी डॉक्टरांकडे गेल्यानंतर डॉक्टर काय परीक्षण करतील?
ड) माझे बाळ चांगले दिसते आहे व चाचणीचे रिपोर्ट्स पण आता नॉर्मल आले आहेत तरी देखील मी औषध देणे आवश्यक आहे का?

प्र.८ अ) माझ्या बाळाला इतर काही आजार झाल्यास मी त्या आजाराकरता औषध देवू शकतो का?
ब) माझ्या बाळाला या आजारात लसीकरण करता येईल का?

प्र.९ या आजारामुळे माझ्या बाळाला भविष्यात इतर आजार होऊ शकतात का?

प्र.१० अ) माझ्या इतर मुलांना सुद्धा हा आजार असू शकतो का? त्याकरता मी इतर बाळांच्या कुठल्या चाचण्या केल्या पाहिजेत?
ब) हा आजार असलेल्या पालकांच्या मुलांमध्ये हा आजार होण्याचा धोका असू शकतो का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020-2021**

Piyush Gupta, IAP President 2021
Remesh Kumar R, IAP President-Elect 2021
Bakul Parekh, IAP President 2020
GV Basavaraja, IAP HSG 20202021
Deepak Ugra, National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***


# ६०

# जन्मजात व जन्मानंतर हायपोथायरॉईडीझम

## प्र. १ अ)

### थायरॉईड ग्रंथी म्हणजे काय? शरीरात ती कुठे असते?

उत्तर :- थायरॉईड ग्रंथी ही एक ऐन्डोक्राइन (अंत:स्त्रावी) ग्रंथी आहे. ही ग्रंथी आपल्या गळ्यात असलेल्या ॲडम्स ॲपल नावाच्या हाडाखाली व श्वसन नलिकेच्या दोन्ही बाजूला असते. या ग्रंथीचे डावा व उजवा असे दोन भाग असतात व ती फुलपाखराच्या पंखा सारखी दिसते.





आकृती १ : थायरॉईड ग्रंथी

## प्र. १ ब)

## थायरॉईड ग्रंथीचे काय कार्य असते?

उत्तर : थायरॉईड ग्रंथी रक्तात सोडणारे दोन प्रकारचे संप्रेरक (अंतस्त्राव) तयार करते.
१) थायरॉक्सिन (T4) व ट्रायआयडॉथायरॉक्सिन (T3) हे दोन्ही संप्रेरक मेंदूत असलेल्या पिट्यूटरी ग्रंथीद्वारे निर्माण होणाऱ्या थायरॉईड स्टीम्युलेटिंग संप्रेरक (TSH) या ग्रंथीद्वारे नियंत्रित केले जातात.




**आकृती २ : थायरॉईड संप्रेरकाचे नियंत्रण**

## प्र. १ क)

## लहान मुलांमध्ये थायरॉईड संप्रेरकाचे काय महत्व असते?

उत्तर : मुलांना थायरॉईड संप्रेरक खालील गोष्टींसाठी आवश्यक असते.

- खालील क्रियांच्या नियंत्रणाकरिता
  - ❖ शरीराचे तापमान
  - ❖ हृदयाची गती
  - ❖ आतड्यांच्या हालचाली
- हाडांची, दातांची व स्नायूंची वाढ
  - ❖ गरोदरपणात आणि बालपणात मेंदूची वाढ व विकास
  - ❖ तारुण्यातीव अवयवांची परिपक्वता

हे संप्रेरक कमी असणे किंवा जास्त असणे यामुळे आरोग्याच्या काही गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.

## प्र. २ अ)

## हायपोथायरॉईडीझम म्हणजे काय?

उत्तर : जेव्हा शरीरात थायरॉईड ग्रंथीद्वारे थायरॉक्सिन किंवा ट्राय आयडॉथायरॉक्सिन ही संप्रेरके कमी प्रमाणात तयार केली जातात तेव्हा हा आजार होतो. अशावेळेस पिट्युटरी ग्रंथीद्वारे थायरॉईड स्टीम्युलेटिंग संप्रेरक (TSH) जास्त तयार केले जाते.

**हायपोथायरॉईडीझम** ⬇ T४ ⬆ TSH

**आकृती ३ : हायपोथायरॉईडीझम** T४ (TSH)

## प्र. २ ब)

## जन्मजात हायपोथायरॉईडीझम म्हणजे काय?

उत्तर : जन्मजात याचा अर्थ तुमच्या बाळात जन्मल्यापासूनच हायपोथायरॉईडीझम नावाचा आजार असतो. थायरॉईड ग्रंथी एकतर विकसित न झाल्यामुळे अथवा काही कारणामुळे कार्य करीत नसल्यामुळे जन्मल्यापासूनच त्याला हायपोथायरॉईडीझम असे म्हणतात.

**कारणे :-**

- शरीरात थायरॉईड ग्रंथी नसणे किंवा विकसीत न होणे.
- शरीरात दुसऱ्याच कुठल्यातरी ठिकाणी ग्रंथी असणे.
- ग्रंथी असते पण विकसीत न झाल्यामुळे संप्रेरके तयार न होणे.
- आईत गरोदरणात आयोडिनची कमी असणे किंवा काही थायरॉईडच्या आजारा करता आईने औषधोपचार घेणे.
- केंद्रीय मज्जासंस्थेच्या पिट्युटरी ग्रंथीतच काही समस्या निर्माण होणे.

## प्र. २ क)

## जन्मानंतर होणारा (acquried) हायपोथायरॉईडीझम म्हणजे काय?

उत्तर : जन्मल्यानंतर बालपणात काही किशोरावस्थेत काही कारणांमुळे थायरॉईड संप्रेरकेची निर्मिती कमी झाली किंवा झाली नाही तर त्याला ऍक्वायर्ड हायपोथायरॉईडीझम असे म्हणतात.

**कारणे :-**

- शरीरात आयोडीन खूप कमी किंवा खूप जास्त असणे.
- हाशिमोटोज या विशिष्ट आजारामुळे थायरॉईड ग्रंथीस इजा होणे ह्या आजारामध्ये शरीराची प्रतिकारशक्ती यंत्रणा थायरॉईड ग्रंथीलाच खराब करते आणि त्याचे कार्य कमी करते.
- काही औषधांमुळे थायरॉईड ग्रंथीस इजा होणे.
- काही आजाराममुळे उदा.: मधुमेह, सीलियक डिसीज, डाऊन सिंड्रोम, यकृताचे काही आजार, टर्नर सिंड्रोम याचा ग्रंथीवर विपरीत परिणाम होतो.
- थायरॉईड ग्रंथीस इजा झाल्यास उदा. काही आजारानंतर संसर्ग, कॅन्सर मधल्या उपचारानंतर रेडिएशन थेरपी घेतल्यास ग्रंथीस इजा पोहोचते.

प्र.३

## माझ्या मुलाला हा आजार आहे हे मी कसे ओळखावे?

उत्तर : हा आजार खालील लक्षणावरुन ओळखता येतो.

| "जन्मत: हायपोथायरॉईडीझम" | "जन्मल्यानंतर होणाऱ्या हायपोथायरॉईडीझमची काही लक्षणे" |
|---|---|
| ★ जन्मजात कावीळ व पिवळेपणा जो २ आठवड्यानंतर ही कायम राहतो. | ★ उंची कमी वाढणे. |
| ★ संडास कडक होणे. | ★ दात उशिरा येणे, गळ्यावर सूज दिसणे (गॉईटर). |
| ★ नाळेच्या ठिकाणी हर्निया | ★ बौद्धिक विकास कमी होणे, त्यामुळे स्मरणशक्ती व एकाग्रतेत कमतरता राहणे. |
| ★ खूप झोप असणे किंवा हालचाल संथ करणे. | ★ तारुण्याची लक्षणे उशिरा सुरु होणे. |
| ★ रडण्याचा आवाज घोगरा असणे. | ★ मासिक पाळी न येणे किंवा मासिक पाळीत अनियमितता. |
| ★ शरीराची वाढ, विकास आणि मानसिक विकास न होणे. | ★ शरीराचे कमी तापमान . |
| ★ शरीराचे तापमान कमी असणे. | ★ लवकर थकवा येणे. ★ नाडी संथ चालणे. |
| ★ जीभ तुलनात्मक दृष्ट्या मोठी दिसणे | ★ त्वचा शुष्क दिसणे व केस गळणे. |
| ★ डोळ्याभोवती सूज | ★ चेहऱ्यावर सूज दिसणे. |
| ★ कमकुवत स्नायू | ★ गुडघ्याखालील मास पेशींवर सूज येणे. |

प्र.४ अ)

## हायपोथायरॉईडीझम हे निदान करण्याकरता कोणत्या चाचण्या करणे आवश्यक आहे?

उत्तर : जन्मजात हायपोथायरॉईडीझमच्या निदनासाठी आवश्यक तपासण्या (आकृती ४)

जन्मजात हायपोथायरॉईडीझम हा क्वचित होणारा आजार नाही. (दर २००० बालकामागे एकास हा आजार होतो.) जर पहिल्या दोन आठवड्यात ह्याचे निदान झाले नाही तर मुलांची बुद्धिमत्ता आयुष्यभर कमी होते, त्यामुळे जन्मताच सर्वच बाळांची या आजारासाठी चाचणी होणे महत्वाचे आहे.

जन्मल्यानंतर नाळेतूनच थोडेसे रक्त घेणे (हे वेदनारहित असते) किंवा पुढील ४८ ते ७२ तासानंतर पायाच्या टाचेतून काही थेंब रक्त घेऊन टी एस एच ही चाचणी करणे कधीही चांगले आणि त्या चाचणीत समस्या दिसल्यास निदानासाठी रक्ताची पुढे सविस्तर चाचणी करणे (TSH आणि T४) आवश्यक असते.



(आकृती ४ : बाळाच्या पायाच्या टाचेतून शुष्क कागदावर रक्त थेंब घेऊन TSH तपासणी करतांना)

क्वचित प्रसंगी या चाचणीचे रिपोर्ट्स नॉर्मल असले तरी बाळात ही समस्या असू शकते. अशा वेळेस बाळास आजाराची लक्षणे दिसल्यास लगेचच रक्ताची चाचणी करावी. जन्मल्यानंतर आजाराची लक्षणे दिसल्यास सर्व चाचण्या करुन घ्याव्यात.

जन्मानंतरचे हायपोथायरॉईडीझम :

लहान मुलांमध्ये हायपोथायरॉईडीझम ची लक्षणे आढळल्यास संपूर्ण थायरॉइड कार्य (तपासण्या (TSH) आणि T४ किंवा T४ खुले ) कराव्या, जर T४ चे प्रमाण कमी असल्यास हायपोथायरॉईडीझम आहे असे समजावे.

## प्र.४ ब)

## थायरॉईडच्या चाचण्यांशिवाय इतर काही चाचण्या करणे आवश्यक असते का? याचा निदान व उपचारात काय फायदा होतो?

उत्तर : गळ्याची सोनोग्राफी करुन ग्रंथी गळ्यातच आहे की नाही, ग्रंथीचा आकार कसा आहे आणि गळ्यात नसेल तर शरीरात ही ग्रंथी कुठे आहे याची सोनोग्राफी करणे आवश्यक तसेच काही केसेसमध्ये रेडिओ न्यूक्लिओटाईड स्कॅन जास्त उपयोगाचा आहे.

तसेच इतरही काही चाचण्या वैद्यकीय सल्ल्यानुसार करुन घ्याव्यात . उदा. जन्मानंतर हायपोथायरॉईडीझमची शक्यता वाटल्यास, हाशिमोटो आजार असल्यास प्रतिकारशक्तीच्या विशेष तपासण्या करुन घ्याव्यात.

## प्र.४ क)

## या चाचण्या करणे कितपत सुरक्षित आहेत?

उत्तर : या चाचण्या अत्यंत सुरक्षित आहेत.

## प्र.५

## या उपचाराबद्दल मी आणखी काय जाणून घ्यायला हवे?

**उत्तर : जन्मतः आजार असणे.**

अ. बाळास उपचाराची गरज आहे का ?

उत्तर : होय. चाचण्यांचे रिपोर्ट चांगले नसतील तर लगेच औषधोपचार सुरु करावेत. न केल्यास बाळ मतिमंद होऊ शकते.

ब. हे औषध कधी व केव्हा द्यावे ?

उत्तर : बाळास उपाशीपोटी स्तनपान देण्यापूर्वी काही आहार देण्यापूर्वी अर्धा तास आधी हे औषध द्यावे. शक्यतो दररोज त्याच वेळेस द्यावे. पातळ औषध उपलब्ध नसल्यामुळे गोळीचा चुरा करुन चमच्याने आईच्या दुधात मिसळून अथवा पाण्यात मिसळून हे औषध द्यावे. गोळीचा चुरा करुन पाण्यात मिसळून अनेक दिवसा करता औषध साठवून ठेवू नये.

क. उपचार कधीपर्यंत द्यावेत ?

उत्तर : जर शरीरात थायरॉईड ग्रंथी नसेल किंवा शरीरात दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी थायरॉईड ग्रंथी असेल तर आयुष्यभर हे उपचार द्यावे लागतील.

काही रुग्णात थायरॉईड ग्रंथी आहे पण कार्यरत नाही अशा थायरॉईडचे कार्य सुरू होईपर्यंत साधारणत: तीन वर्षे औषध द्यावे लागते. पण डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध बंद करु नये.

**जन्मानंतर झालेला हायपोथायरॉईडीझम आजार.....**

अ) माझ्या मुलास उपचार करावेच लागतील का ?

होय. तुमच्या बाळाची ग्रंथी पुरेशा प्रमाणात संप्रेरके तयार करत नसल्यामुळे त्यालाही उपचार द्यावेच लागतील व कधी पर्यंत हे त्याच्या रक्ताच्या तपासणीवर अवलंबून असते. जर Free T४/T४ सामान्य असेल आणि (TSH) ची पातळी थोडीशी उंचावली असेल (<10mIU/L: सबक्लिनिकल हायपोथायरॉईडीझम) किंवा T४ दोन्ही TSH असल्यास किंवा आणि रिपोर्ट सामान्य असल्यास डॉक्टरांचा सल्लाने उपचार थांबवले तरी चालेल पण अशा केसमध्ये देखील वारंवार पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

ब. औषध कधी व केव्हा द्यावे ?


उत्तर : ही औषधे उपाशीपोटी अथवा जेवणाच्या अर्धा तास अगोदर द्यावीत.

क. उपचार कधीपर्यंत द्यावेत ?

उत्तर : हा प्रदीर्घ आजार आहे त्यामुळे औषधोपचार प्रदीर्घ कालावधीचा करावा लागेल. कदाचित आयुष्यभर पण. थायराइड संप्रेरकाकरिता नियमित रक्त तपासावे व रक्ताच्या चाचण्यांनंतर औषधांचे प्रमाण बदलावे लागेल. चाचण्यांचे रिपोर्ट चांगले किंवा अपेक्षित आल्यानंतरही औषध थांबवावे लागले तरीही नियमित रक्ताची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे व हा निर्णय रक्त तपासणीवर अवलंबून असेल.

## प्र.६

## या उपचाराबद्दल मी आणखी काय जाणून घ्यायला हवे?




आकृती ५ : थायरॉईड ची औषधे घेताना

अ. औषधांचे दुष्परिणाम होतात का ?

उत्तर : बहुतेक नाही. कारण शरीराला ही संप्रेरके कमी असल्यामुळे आपण ही औषधे देत आहोत.

ब. द्रव स्वरुपात औषध उपलब्ध आहे का ?

उत्तर : नाही, द्रव स्वरुपात ही औषधे उपलब्ध नाहीत.

क. एखाादा डोस देण्यास चुकला तर काय करावे ?

उत्तर : शक्यतो डोस चुकू देऊ नका. एखादी वही, डायरी ठेवा किंवा किती गोळ्या घेतल्या व किती शिल्लक राहिल्या आहेत याची नोंद ठेवा व दर आठवड्याला आढावा घ्या. एखाद्या वेळेस सकाळी गोळी चुकली तर संध्याकाळी घ्या पण असे नेहमी होता कामा नये.

ड) या औषधांबरोबर इतर औषधे घेतली तर चालेल का ?

उत्तर : शक्यतो या औषधांबरोबर इतर औषधे घेवू नयेत. कॅल्शियम, रक्त वाढायचे औषध, झिंक आणि सोया या बरोबर या औषधाचे शोषण योग्यप्रकारे होत नाही.

इ) औषध घेतल्यानंतर बाळाने उलटी केल्यास काय करावे ?

उत्तर : अर्ध्या तासात उलटी केल्यास औषध परत द्यावे.

फ) कोबी अथवा फुलकोबीचे सेवन बंद करावे का ? काही पथ्य पाळणे आवश्यक आहे का ?

उत्तर : बाळाला नेहमीचा आहार चालू ठेवावा असे कुठलेही पथ्य पाळण्याची गरज नाही.

ग) या औषधांशिवाय इतर औषधाने हा आजार बरा होऊ शकतो का ?

उत्तर : नाही. थायरॉइड संप्रेरक देणे हाच या आजारावर एकमेव उपचार आहे.

## प्र.७ अ)

## निदान झाल्यानंतर मी डॉक्टरांकडे कधी जायला पाहिजे?

उत्तर : औषधोपचार सुरु केल्यानंतर २-४ आठवड्यांनी डॉक्टरांना भेटावे. डॉक्टरांना त्यांच्या सल्ल्याप्रमाणे नियमित भेटावे व नियमित भेटावे व नियमित औषध चालू ठेवावे, जेणेकरुन बाळाची बौद्धीक, मानसिक व शारीरिक वाढ चांगली होऊ शकेल.

## प्र.७ ब)

## मी रक्त तपासण्या किती किती अंतराने केल्या पाहिजेत?

उत्तर : ३ वर्षाखालील मुलांसाठी दर दोन ते तीन महिन्यांनी ही चाचणी करावी. तर तीन वर्षावरील मुलांसाठी यौवनात पदार्पण करेपर्यंत दर तीन ते सहा महिन्यांनी ही चाचणी करावी. जर मधेच डोस बदलावा लागला तर चार ते सहा आठड्यांनी परत चाचणी करावी.

## प्र.७ क)

**मी डॉक्टरांकडे गेल्यानंतर डॉक्टर काय परीक्षण करतील?**

उत्तर : औषध सुरु करण्यापूर्वी Free T३ व TSH ही चाचणी केलेली असते. औषधाचा डोस पुरेसा होतो आहे का नाही हे पाहण्याकरता रक्ताची चाचणी आवश्यक असते. डोस खूप कमी पडत असेल तर हालचाल संथ होते, थकवा येतो, संडास कडक होते आणि खेळकरपणा, खूप हालचाल, बाळ थोडेसे गरम लागणे, सतत लघवी संडास होणे, भूक न लागणे, वजन वाढणे ही लक्षणे दिसू लागतात.

## प्र.७ ड)

**माझे बाळ चांगले दिसते आहे व चाचणीचे रिपोर्ट्स पण आता नॉर्मल आले आहेत तरी देखील मी औषध देणे आवश्यक आहे का?**

उत्तर : होय, चाचण्यांचे रिपोर्ट्स नॉर्मल येणे हाच औषधांचा उद्देश आहे. वयाप्रमाणे, वजनाप्रमाणे औषधाचा डोस वाढवावा लागतो. औषध चालू ठेवावयाचे की नाही याचा निर्णय जर जन्मत: हायपोथायरॉइडझम असेल तर तीन वर्षांने व जन्मानंतर हा आजार झाला असेल तर बाळाची पूर्ण वाढ झाल्यानंतर यौवनावस्था सुरू झाल्यानंतर हा निर्णय घेता येतो.

## प्र.८ अ)

**माझ्या बाळाला इतर काही आजार झाल्यास मी त्या आजाराकरता औषध देवू शकतो का?**

उत्तर : होय, इतर औषधांबरोबर थायरॉईडची औषधे चालू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

प्र.८ ब)

## माझ्या बाळाला या आजारात लसीकरण करता येईल का?

होय. तुमच्या बाळास नियमितपणे लसीकरण ठरलेल्या वेळेत करता येते व करणे आवश्यक आहे.

प्र.९

## या आजारामुळे माझ्या बाळाला भविष्यात इतर आजार होऊ शकतात का?

उत्तर : ज्या बाळाला अगदी सुरुवातीपासून व नियमित उपचार सुरु असेल तर त्यांची शारीरिक व मानसिक वाढ व्यवस्थित होते पण ज्यांना योग्य वेळी व योग्य प्रमाणात उपचार मिळाला नसेल तर त्यांना कायम स्वरुपी मतिमंदत्व, शारीरिक, शैक्षणिक वाढ खुंटणे इत्यादीना सामोरे जावे लागते.

या बाळात बाकीचे आजार होण्याची शक्यता इतर बालकांइतकीच असते पण ज्यांना ऑटोइम्युन आजारांमुळे, स्वयंप्रतिकाराच्या आजारामुळे हायपोथायरॉइडझम हा आजार झालेला आहे त्यांना या प्रकारचे इतर आजार होण्याची शक्यता असते.

प्र.१० अ)

## माझ्या इतर मुलांना सुद्धा हा आजार असू शकतो का? त्याकरता मी इतर बाळांच्या कुठल्या चाचण्या केल्या पाहिजेत?

उत्तर : बहुतांश कुटुंबात एखाद्या मुलाला हा आजार असेल तर इतर मुलात हा आजार होण्याची शक्यता कमी असते. पण काही काही मुलांना जर हायपोथायरॉइडझम हा आजार अनुवंशिक असेल तर त्यांच्या इतर मुलात हा आजार होण्याची शक्तता थोडीफार का होईना, पण असते.

जर तुमच्या एखाद्या बाळास जन्मानंतर हा आजार झाला असेल तर त्याला हा आजार का झाला आहे त्या कारणावर इतर मुलात हा आजार का झाला आहे त्या कारणावर इतर मुलात हा आजार होण्याची शक्यता अवलंबून असते त्यामुळे ज्या घरात हा आजार आहे त्या कुटुंबातल्या सर्व मुलांची या आजारा करता अधून मधून चाचणी करावी.

## प्र.१० ब)

## हा आजार असलेल्या पालकांच्या मुलांमध्ये हा आजार होण्याचा धोका असू शकतो का?

उत्तर : जन्मत: होणारा हायपोथायरॉईडीझम ज्या केसेस मध्ये दोन्ही आई आणि वडील यांना जन्मत:च हायपोथायरॉईडीझम आहे त्यांच्या मुलांना हा आजार होण्याची शक्यता कमी असते.

जन्मल्यानंतर होणारा हायपोथायरॉईडीझम बहुतेक हा तुमच्या स्वयंप्रतिकार शक्तीच्या आजाराशी निगडित असल्यामुळे अशी शक्यता आहे की हा आजार कौटुंबिक असू शकतो. त्याकरता त्या कुटुंबातल्या सर्व मुलांची हायपोथायरॉईडीझम करता अधून-मधून रक्त तपासणी करावी.

### हे करा.....

- प्रत्येक नवीन जन्मलेल्या बाळाची या आजार करता जन्मल्यानंतर लगेच अथव ४८ ते ७२ तासाच्या आत चाचणी करा.
- औषधे नियमित व सकाळी उपाशी पोटी द्या
- निदान झाल्यानंतर नियमितपणे मतिमंदत्व, शैक्षणिक समस्या आणि इतर वाईट परिणाम होणार नाहीत.

### हे करु नका.....

- दुसऱ्या कुठल्या औषधांबरोबर अथवा अन्नपदार्थांबरोबर हे औषध देऊ नका.
- औषधाचा डोस स्वत:च्या मनाने कमी किंवा जास्त करु नका.
- दुसरा आजार झाल्यानंतर या आजाराचे औषध कमी करु नका किंवा बंद करु नका.